उपसचिव, महाराष्ट्र शासन.

**५१. अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव साधने पुरविणे या योजनेंतर्गत अंध विद्यार्थ्यांना टेपरेकॉर्डर देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

शासन निर्णय, क्रमांक इडीडी-१०८८/४७४५९/ केनं.३१० सुधार-२,
**दिनांक ९ ऑक्टोबर १९८९.**

वाचा : (१) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक इडीडी-१०६३/ न, दिनांक २५ जुलै १९६२.

(२) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांड इडीडी-१०६२/५९५१३/न, दिनांक ११ जुलै १९६३.



File No. क्रमांक:योजना-2026/प्र.क्र.5/कार्यासन-3 (Computer No. 1518327)
Scanned with CamSca
Generated from eOffice by APPASAHEB ROHIDAS KADAM, A. S. O (APPASAHEB KADAM), ASSISTANT SECTION OFFICER, PERSONS WITH DISABILITIES WELFARE DEPARTMENT on 12/02/202

(३) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक इडीडी-१०७९/१२३६० /का-१०, दिनांक ७ मे १९८१.

(४) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक इडीडी-१९८६/ ३५५/ सीए-२, दिनांक १५ जानेवारी १९८७.

(५) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक इडीडी-१०८८/१२१८५/केनं-८२/ सुधार-२, दिनांक १० ऑगस्ट १९८९.

**शासन निर्णय** :अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व उपकरणे जसे वैयक्तिक श्रवणयंत्रे, चष्मे, तीन चाकी सायकली, दुचाकी खुर्च्या, कॅलीपर्स, बूट, मानेचे पट्टे, स्पीनल प्रेसेस, जॅकेट इत्यादी साधने, शासनाकडून पुरविण्याची किंवा त्याकरिता आर्थिक सहाय्य देण्याची योजना वर नमूद केलेल्या दिनांक २५ जुलै १९६२ व दिनांक ११ जुलै १९६३ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली असून त्यामध्ये दिनांक ७ मे १९८१, दिनांक १५ जानेवारी १९८७ आणि दिनांक १० ऑगस्ट १९८९ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली. तथापि, सदर योजनेअंतर्गत एस.एस.सी.नंतरचे शिक्षण घेणाऱ्या अंध विद्यार्थ्यांना टेपरेकॉर्डर व कॅसेटस् पुरविण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

(२) त्यास अनुसरुन अपंगांना कृत्रिम अवयव, साधने पुरविण्याच्या सदरहू योजनेंतर्गत १० वी नंतरचे शिक्षण घेणाऱ्या व दोन्ही डोळ्यांनी अंध असणाऱ्या विद्यार्थ्यांना टेपरेकॉर्डर व कॅसेटस् पुरविण्यास शासन संमती देत आहे.

(३) शासन असेही स्पष्ट करीत आहे की, या योजनेअंतर्गत -

(अ) एका विद्यार्थ्याला एकदाच टेपरेकॉर्डर व कॅसेटस् संच दिला जाईल (१० कॅसेटस् )

(ब) टेपरेकॉर्डर व कॅसेट संच तो विद्यार्थी ज्या शाळेत / महाविद्यालयात शिक्षण घेतो त्या शाळा / महाविद्यालयामार्फत दिला जाईल.

(क) विद्यार्थ्याने दोन वर्षाचे कालावधीत शिक्षण सोडल्यास



File No. क्रमांक:योजना-2026/प्र.क्र.5/कार्यासन-3 (Computer No. 1518327)
Scanned with CamSca
Generated from eOffice by APPASAHEB ROHIDAS KADAM, A. S. O (APPASAHEB KADAM), ASSISTANT SECTION OFFICER, PERSONS WITH DISABILITIES WELFARE DEPARTMENT on 12/02/202

त्या वस्तू संबंधित शाळा / महाविद्यालय त्या विद्यार्थ्यांकडून परत घेऊन संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचेकडे त्वरीत सुपूर्द करील.

(४) याबाबत होणारा खर्च "२२३५-सामाजिक सुरक्षा व समाज व कल्याण-०२-समाज-कल्याण-१०१-अपंग व्यक्तींचे कल्याण (३) अस्थिव्यंगामुळे अपंग असलेल्या शिक्षण व कल्याण- (दोन) (ए) शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव इत्यादी देणे-सहाय्यक अनुदान (२२३५०८२१) मागणी क्रमांक एन-६" या अर्थशिर्षाखाली खर्ची घालण्यात येऊन त्याखाली १९८९-९० या आर्थिक वर्षात केलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

(५) हा शासन निर्णय, वित्त विभागाचे सहमतीने वित्त विभाग अनौ. संदर्भ, क्रमांक सीआर/८०७/व्यय/११, दिनांक २९ सप्टेंबर १९८९ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

ज.द.बेशरकार,
सहाय्यक सचिव





Scanned with CamSca

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

## ४९. अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे-नियमात सुधारणा....

**महाराष्ट्र शासन**

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

शासन निर्णय, क्र. इडीडी-१०८८/१२१८५/ के.नं.८२/ सुधार-२,

**दिनांक १० ऑगस्ट १९८९.**

**वाचा :** (१) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्र. इडीडी-१०६३/न, दिनांक २५ जुलै १९६२.

(२) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग क्र. इडीडी-१०६२/५९५१३/न, दिनांक ११ जुलै १९६३.

(३) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र. इडीडी-१०७९/ १२३६०/का-१०, दिनांक ७ मे १९८१.

(४) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.इडीडी-१०८६/३५५/सीए-२, दिनांक १५ जानेवारी १९८७.

(५) संचालक; समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक डीएसडब्ल्यू-आरएमओडी-एफएच-रुल्स/ एसएसडब्ल्यू/जी-७/ ३४१२, दिनांक ७ मार्च १९८८ व क्रमांक इआरएच/ डीडी / एमओडीएफ-रुल्स/ एडस् -एपीपी-का-७, दिनांक १२ जुलै १९८८.

**शासन निर्णय :-** अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व उपकरणे जसे वैयक्तिक श्रवण यंत्रे, चष्मे, तीन चाकी सायकली, दुचाकी खुर्च्या, कॅलिपर्स, अपंगाचे बूट, मानेचे पट्टे, स्पिनल प्रेसेस, जॅकेट, इत्यादी साधने, शासनाकडून पुरविण्याची किंवा त्यांकरिता सहाय्य देण्याची



File No. क्रमांक:योजना-2026/प्र.क्र.5/कार्यासन-3 (Computer No. 1518327)
Generated from eOffice by APPASAHEB ROHIDAS KADAM, A. S. O (APPASAHEB KADAM), ASSISTANT SECTION OFFICER, PERSONS WITH DISABILITIES WELFARE DEPARTMENT on 12/02/202
Scanned with CamSca

योजना दिनांक २५ जुलै १९६२ व दिनांक ११ जुलै १९६३ च्या शासन निर्णयाअन्वये मंजूर करण्यात आली असून त्यामध्ये दिनांक ७ मे १९८१ च्या शासन निर्णयान्वये अंशतः सुधारणा करण्यात आली होती आणि दिनांक १५ जानेवारी १९८७ च्या शासन निर्णयाद्वारे एका अपंग व्यक्तीसाठी रुपये १,००० ऐवजी रुपये १,३५० इतक्या किंमतीचे कृत्रिम अवयव व उपकरणे खरेदी करण्याचे अधिकार संचालक, समाजकल्याण, पुणे, यांना देण्यात आले होते. सदर योजनेमध्ये कृत्रिम अवयव व उपकरणे पुरविण्याबाबत केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे उत्पन्न व आर्थिक सहाय्याच्या मर्यादेत बदल करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

(२) त्या अनुसरुन वरील शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अपंगांना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे याबाबतच्या योजनेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मंजुरी देत आहेः-

(अ) सदरहू योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी उत्पन्नाची मर्यादा तथा अवयव व साधने खरेदीसाठी आर्थिक सहाय्याची मर्यादा खालीलप्रमाणे राहील :-

| मासिक उत्पन्न | अवयव व साधने खरेदीसाठी आर्थिक मदतीची मर्यादा |
|---|---|
| (१) | (२) |
| रुपये १,५०० पर्यंत | १०० टक्के |
| रुपये १,५०० ते २,००० | ५० टक्के |

(ब) कृत्रिम अवयव व साधने प्रौढ व्यक्तींना ३ ते ५ वर्षातून एकदा व १५ वर्षाखालील मुलांना दरवर्षी देण्यात येतील.

(क) कृत्रिम अवयवासाठी आर्थिक सहाय्याची मर्यादा ही कमीत कमी रुपये २५ ते जास्तीत जास्त रुपये ३,००० पर्यंत राहील.

(ड) कृत्रिम अवयव बसविण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या खर्चाच्या (Fitting charges) १५ टक्के ही रक्कम लाभार्थ्यांस देण्यात येईल.

(इ) कृत्रिम अपंगांसाठी रेल्वे व एस.टी. वाहतूक खर्च रुपये १५० पर्यंत देय राहील व अस्थिव्यंग व्यक्तींबाबत तज्ज्ञाने साथीदारांविषयी शिफारस केली असल्यास ही सवलत साथीदारासही देय राहील.





Scanned with CamSca

(फ) ज्या अपंगांचे उत्पन्न दरमहा रुपये १,२०० पर्यन्त आहे अशा कृत्रिम अवयव बसविण्यासाठी दाखल होणाऱ्या अपंग व्यक्तींना भोजव निवासासाठी प्रतिदिनी रुपये १० देय असतील. तथापि, अशा प्रत्येक अपंगास देण्यात येणारी एकूण रक्कम रुपये १०० पेक्षा जास्त असणार नाही. तसेच अपंग व्यक्तींच्या मदतनीसास भोजन व निवासासाठी अर्थसहाय्य दिले जाणार नाही.

(३) याबाबत होणारा खर्च रुपये ९०,००० (रुपये नव्वद हजार फक्त) हा "२२३५-०२-समाजकल्याण-१०१-अपंग व्यक्तींचे कल्याण (३) अस्थिव्यंगामुळे अपंग असलेल्यांचे शिक्षण व कल्याण (दोन) (ए) शारीरिकदृष्ट्या अपंग असलेल्या व्यक्तींना कृत्रिम अवयव इत्यादी पुरविणे-सहाय्यक अनुदान (२२३५-०८२१)" या अर्थशीर्षाखाली खर्ची घालून त्या खालील सन १९८९-९० या आर्थिक वर्षात केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

(४) हा शासन निर्णय, वित्त विभागाचे सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ पत्र क्रमांक ५६२ / ८९/व्यय-११, दिनांक १८ जून १९८९ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज.द. बेशरकर,**
सहाय्यक सचिव.





Scanned with CamSca

9593434/2026/Desk-3 Health, Rehabilitation and well-being Desk

# अपंग कल्याण

# आणि

# पुनर्वसन योजना

अपंगांचे शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन.
समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

किमत : रु. १७.००

...राष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१



File No. क्रमांक:योजना-2026/प्र.क्र.5/कार्यासन-3 (Computer No. 1518327)
Scanned with CamSca
Generated from eOffice by APPASAHEB ROHIDAS KADAM, A. S. O (APPASAHEB KADAM), ASSISTANT SECTION OFFICER, PERSONS WITH DISABILITIES WELFARE DEPARTMENT on 12/02/202

## योजना क्रमांक ९

# अपंगांना वैयक्तीक गरजेनुसार कृत्रीम साधने, अवयव, तीनचाकी सायकली श्रवणयंत्रे, चष्मे, इत्यादी देण्याची राज्य शासन योजना

शा.नि. क्रमांक (मूळचा) शिक्षण व समाज कल्याण-इडीडी-१०८२/एन, दिनांक २५ जुलै १९६२; इडीडी/१०६२/५९५१३/एन, ११ जुलै १९६३, सुधारित क्रमांक इडीडी/१०७९/१२३६०/का/१०, दिनांक ७ मे १९८१ व सुधारित क्रमांक इडीडी/१०८८/१२१८५/के. नं. ८२/सुधार ९, दिनांक १० ऑगस्ट १९८९.

अपंगांना त्यांचे अपंगत्व सुधारण्यासाठी अपंगत्वाची वाढ रोखण्यासाठी व त्यांच्या हालचाली सुलभ होण्यासाठी अपंगत्वानुसार निरनिराळी कृत्रिम साधने अत्यावश्यक असतात. तथापि, या साधनांची किमत सामान्य पालकांना/व्यक्तींना त्यांच्या मर्यादित उत्पन्नातून देता येत नाही. अशा आर्थिकदृष्टया मागासलेल्या गरजू अपंगाना कृत्रिम साधने-उपकरणे उपलब्ध व्हावीत, वयोमानाप्रमाणे किंवा आवश्यकते-नुसार ती बदलता यावीत यासाठी राज्य शासनाने कृत्रिम साधने प्रदान योजना अंमलात आणली आहे. या योजनेनुसार अस्थिव्यंग अपंगाला कृत्रिम साधने (कॅलिपर बूट, पाठीचे जॅकेटस् इ. कृत्रिम अवयव तीनचाकी सायकली, मूकबधीरांना श्रवणयंत्रे, गरजुंना चष्मे इत्यादी देण्यात येतात.

ही साधने मिळण्यासाठी शासनाने अधिकृत केलेली केंद्रे :—

(१) कृत्रिम अंग केद्र, वानवडी, पुणे.

(२) डेव्हीड ससून रुग्णालय, पुणे.

(३) कृत्रिम अंगकेंद्र, मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, औरंगाबाद.

(४) नागपूर मेडिकल कॉलेज, नागपूर.

(५) डॉ. आरोळे, सोसायटी कॉम्प्रीहेल्सीव्ह रूलर हेल्थ प्रॉजेक्ट, जामखेड, जिल्हा अहमदनगर.

(६) वानलेस हॉस्पिटल, मिरज, इत्यादी.

**वर निर्देशिलेली साधने मिळण्यांसाठी अर्थसहाय्याचे स्वरुप**

(१) या योजनेखाली लाभ मिळणेसाठी उत्पन्नाची मर्यादा तथा अवयव व साधने खरेदीसाठी आर्थिक सहाय्याची मर्यादा खालीलप्रमाणे राहील.

| मासिक उत्पन्न | अवयव व साधने खरेदीसाठी आर्थिक मदतीची मर्यादा |
|---|---|
| रुपये १,५००—०० पर्यंत | १०० टक्के |
| रुपये १,५०१ ते २,००० | ५० टक्के |

(२) कृत्रिम अवयव व साधने प्रौढ व्यक्तींना ३ ते ५ वर्षातून एकदा व १५ वर्षाखालील मुलांना दरवर्षी देणेत येतील.





Scanned with CamSca

(३) कृत्रिम अवयवासाठी आर्थिक सहाय्याची मर्यादा ही कमीत कमी रुपये २५/- ते जास्तीत जास्त रुपये २,०००/- पर्यंत राहील.

(४) कृत्रिम अवयव बसविण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या खर्चाच्या १५ टक्के ही रक्कम लाभार्थ्यास देण्यात येईल.

(५) अपंगासाठी रेल्वे व एस. टी. वाहतूक खर्च रुपये १५०/- पर्यंत देय राहील व अस्थिव्यंग व्यक्तीबाबत अस्थिव्यंग तज्ज्ञाने साथीदाराविषयी शिफारस केली असल्यास ही सवलत साथीदारासही देय राहील.

(६) ज्या अपंगाचे उत्पन्न दरमहा रुपये १,५००/- पर्यंत आहे, अशा कृत्रिम अवयव बसविण्यासाठी दाखल होणाऱ्या अपंग व्यक्तींना भोजन व निवासासाठी प्रतिदिन रुपये १०/- देय असतील. तथापि अशी प्रत्येक अपंगास देण्यात येणारी एकूण रक्कम रुपये १००/- पेक्षा जास्त असणार नाही. तसेच अपंग व्यक्तीच्या मदतनीसास भोजन व निवासासाठी अर्थसहाय्य दिले जाणार नाही.

**आवश्यक बाबी**

(१) विहीत नमुन्यातील अर्ज.—या अर्जाचा नमुना जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, सल्ला व मार्गदर्शन कक्ष विभागीय समाज कल्याण अधिकारी कार्यालय अथवा समाज कल्याण संचालनालय (अपंग विभाग) महाराष्ट्र राज्य ३ चर्च पथ, पुणे–१ येथे विनामूल्य मिळू शकतील.

(२) अस्थिव्यंगाबाबत अस्थिव्यंग डॉक्टरांचा सही व शिक्का असलेला दाखला मूकबधिराबाबत ओडिओग्रामसह नाक, कान, घसा तज्ज्ञ डॉक्टरांचा दाखला (वैद्यकीय दाखल्यामध्ये अपंगत्वाचा स्पष्ट उल्लेख असावा).

(३) उत्पन्नाचा दाखला स्वतःचा/पालकांच्या उत्पन्नाचा नगरसेवक/सरपंच, तहसिलदार, एम.एल.ए., राजपत्रित अधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यापैकी एकाच्या सहीचा व शिक्क्याचा असावा.

(४) जन्मतारखेचा दाखला (शाळा सोडल्याचा अथवा ग्रामसेवक किंवा जिल्हा शल्यचिकित्सक) याचा असावा.

(५) कृत्रिम अवयव व साधनांच्या बाबतीत वरील कृत्रिम अवयव केंद्रापैकी जवळच्या केंद्राचे कृत्रिम अवयव व साधनांचे किंमत प्रमाणपत्र.

अर्जदारांनी वरील सर्व कागदपत्रासह विहीत नमून्यातील अर्ज संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, विभागीय समाज कल्याण अधिकारी अथवा संचालक, समाज कल्याण (अपंग विभाग), महाराष्ट्र राज्य, ३, चर्च पथ, पुणे–१ यांचेकडे सादर करावा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, विभागीय समाज कल्याण अधिकारी यांनी योग्य ती छाननी करून चौकशी अहवालासह प्रस्ताव मंजुरीसाठी, संचालक, समाज कल्याण यांचेकडे पाठवाबेत.

**श्रवणयंत्रे.**—योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे.

(१) अर्जदाराचे वय ५५ पर्यंत असावे. ५५ च्या पुढे या कार्यालयाकडून श्रवणयंत्र द्यावयाची तरतूद नाही.



File No. क्रमांक:योजना-2026/प्र.क्र.5/कार्यासन-3 (Computer No. 1518327)
Scanned with CamScanner
Generated from eOffice by APPASAHEB ROHIDAS KADAM, A. S. O (APPASAHEB KADAM), ASSISTANT SECTION OFFICER, PERSONS WITH DISABILITIES WELFARE DEPARTMENT on 12/02/202

(२) श्रवण ऱ्हासाचा आलेख अर्जाला जोडणे आवश्यक आहे. त्यावर नाक, कान, घसा तज्ञ डॉक्टरांचा शिक्का व सही असणे आवश्यक आहे.

(३) शाळेमध्ये शिकणाऱ्या वा नोकरी करणाऱ्या वा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीसच श्रवणयंत्र दिले जाते. निरुद्योगी व्यक्तीस नाही.

(४) या कार्यालयाने मान्य केलेल्या कंपनीकडीलच श्रवणयंत्र घ्यावे लागते.

(५) ज्या व्यक्तीने श्रवणयंत्रासाठी वैयक्तिक अर्ज केला असेल त्या व्यक्तीचा चौकशी अहवाल आल्यावरच श्रवणयंत्र दिले जाईल.

(६) पूर्वी कार्यालयाकडून श्रवणयंत्र मिळाले किंवा कसे त्याबाबत संस्थेने व व्यक्तीने अर्जावर नमूद केले पाहिजे.

**तीन चाकी सायकल–**

(१) हाताने चालविता येणारी तीन चाकी सायकलच कार्यालयाकडून दिली जाते.

(२) अर्जदाराचे वय १८ वर्षे पूर्ण असेल तरच तीन चाकी सायकल मिळू शकते. १८ वर्षाच्या आतील व्यक्तीस या कार्यालयाकडून तीन चाकी सायकल दिली जात नाही.

(३) निरुद्योगी व्यक्तीस तीन चाकी सायकल दिली जात नाही.

(४) एका पायाने अधू असणाऱ्या व्यक्तीस तीन चाकी सायकल दिली जात नाही.

(५) दोन्ही पाय निकामी झाले आहेत (अर्धांगाने) अशा व्यक्तीसच तीन चाकी सायकल दिली जाते.

(६) पाय कापलेल्या व्यक्तीस नियमानुसार तीन चाकी सायकल दिली जात नाही.

(७) वैद्यकीय दाखला स्पष्ट पाहिजे. तसा तो नसेल तर अर्जास फोटो जोडला पाहिजे. ज्यातून अपंगत्व स्पष्ट होईल.

**कृत्रिम अवयव, कॅलिपर बुटस् इत्यादीसाठी अर्ज करताना**

(१) वैद्यकीय दाखल्यात अपंगत्वाचा उल्लेख स्पष्ट असावा. त्या अपंगत्वा- नुसार लागणाऱ्या कृत्रिम साधनांचा त्यात उल्लेख असावा.

(२) या योजनेच्या माहितीत सुरुवातीला नमूद केलेल्या ६ कृत्रिम अवयव केंद्रापैकी अर्जदाराला कोणते केंद्र जवळ पडेल त्याचाही अर्जात उल्लेख करावा व त्या केंद्राचे किंमत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

(३) यापूर्वी अर्जदाराला या कार्यालयाकडून कोणत्या स्वरूपाची मदत मिळाली हे नमूद करावे.



File No. क्रमांक:योजना-2026/प्र.क्र.5/कार्यासन-3 (Computer No. 1518327)
Scanned with CamScanner
Generated from eOffice by APPASAHEB ROHIDAS KADAM, A. S. O (APPASAHEB KADAM), ASSISTANT SECTION OFFICER, PERSONS WITH DISABILITIES WELFARE DEPARTMENT on 12/02/202

**अर्जाचा नमुना खाली दिल्याप्रमाणे**

प्रति

जिल्हा अथवा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
अथवा
संचालक, समाज कल्याण विभाग,
महाराष्ट्र राज्य, (अपंग विभाग),
३ चर्च रोड, पुणे–४११ ००१.

**विषय** : कृत्रिम अवयव/वैयक्तिक श्रवणयंत्र/तीनचाकी सायकल उपलब्ध होणेबाबत.

१. अर्जदाराचे नाव ..

२. अर्जदाराची जात ..

३. अर्जदाराचा पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता

४ अर्जदाराचे वय व जन्मतारीख ..
(सोबत दाखला जोडावा)

५. अर्जदार धंदेशिक्षण किंवा व्यवसाय शिक्षण घेत असल्यास त्याबद्दल माहिती.
(दाखला जोडावा)

६. शाळा/कॉलेजचे नाव व पत्ता ..

७. अर्जदार कामधंदा किंवा नोकरी करीत असल्यास त्याबद्दलची माहिती

८. अर्जदाराचे उत्पन्न किती व उत्पन्नाचा दाखला (सरपंच, तहसिलदार किंवा नगरपालिका सभासद वा राजपत्रित अधिकारी यांचा जोडावा)

९. अर्जदाराची कौटुंबिक माहिती ..

१०. शारीरिक व्यंग, अपंगत्व याबद्दलची थोडक्यात माहिती आणि वैद्यकीय दाखला जोडावा. ..

११. अर्जदारास सदर साधनासाठी महाराष्ट्र शासनाकडून यापूर्वी आर्थिक मदत मिळाली आहे काय ? ..

१२. असल्यास; त्याबद्दलची माहिती द्यावी. किती व कोणत्या साधनाकरिता.

**दिनांक :**

**स्थळ :**

**अर्जदाराची सही.**





Scanned with CamSca

## योजना क्रमांक १०

## अपंगांसाठी कार्य करणाऱ्या संस्थामार्फत वैयक्तिक गरजेनुसार कृत्रिम साधने श्रवणयंत्रे, कृत्रिम अवयव, तीनचाकी सायकल, चष्मे इत्यादी देण्याची केंद्र शासनाची योजना

भारत सरकार समाज कल्याण मंत्रालय,
पत्र क्रमांक ४-२३/८२-एचडब्ल्यू
दिनांक १६ ऑगस्ट १९८२

गरजू व्यक्तींना त्यांना आवश्यक असलेल्या साधनांचा पुरवठा खाली निर्देशिलेल्या केंद्र शासनाच्या अधिकृत संस्थांकडून होईल. यासाठी त्यांनी अर्ज मात्र भारत सरकारकडे करावा. अर्जाचा नमुना संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, प्रथम श्रेणी किंवा सल्ला व मार्गदर्शन केंद्राकडे मिळेल.

केंद्र शासनाने कृत्रिम अवयव व कृत्रिम साधने देण्यासाठी अधिकृत केलेल्या संस्थांची यादी :—

(१) कृत्रिम अंगकेंद्र वानवडी, पुणे.

(२) शिक्षण प्रसारक मंडळ (रुईया मूकबधीर विद्यालय) एस. पी. कॉलेज कंपौंड, पुणे.

(३) किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल, टी. डी. एच. सेंटर, पुणे.

(४) इंडियन कॅन्सर सोसायटी फॉर कॅन्सर पेशन्टस् भायखळा, मुंबई, फोन नंबर ४११२५७८/४१२१५१९.

(५) फेलोशिप ऑफ फिजिकली हॅण्डीकॅप्ड, हाजीअली, मुंबई.

(६) राष्ट्रीय अपंग विकास संस्था, पोस्टल कॉलनी रोड, चेंबूर, मुंबई—४०० ०७१ फोन नंबर ५२४०२७/५२४५९६.

(७) मोक्ष, इम्पेक्ट इंडीया फौंडेशन द्वारा: यु. एन. डी. पी. रविन्द्र मॅन्शन, दिनशा वाच्छा रोड, मुंबई—४०० ०२४. फोन नंबर २०२९५९०.

(८) अयोध्या चॅरिटेबल ट्रस्ट, ५७७, शुक्रवार पेठ, पुणे ४०० ००१, फोन नंबर ४४८५७५.

(९) नॅशनल असोशिएन फॉर द ब्लाईन्ड इंडिया, खान अब्दुल गफार खान रोड, वरळी, सी फेस, मुंबई—४०० ०२५, फोन नंबर ४९३६९३०/४९३५३६५



File No. क्रमांक:योजना-2026/प्र.क्र.5/कार्यासन-3 (Computer No. 1518327)
Generated from eOffice by APPASAHEB ROHIDAS KADAM, A. S. O (APPASAHEB KADAM), ASSISTANT SECTION OFFICER, PERSONS WITH DISABILITIES WELFARE DEPARTMENT on 12/02/202
Scanned with CamSca